# ग्रामपंचायत लोणी

## ता.खंडाळा जि.सातारा.

निविदांतर्गत निविदा सूचना

बी -१ निविदा सूचना क्र १

ग्रामपंचायत लोणी , ता.खंडाळा , जि.सातारा ( दुसरी वेळ)

मौजे लोणी येथील ग्रामपंचायत कार्यालया साठी ५ kw (१phase) क्षमतेची सोलार सिस्टिम बसविणे व कार्यन्वित करणे आणि मौजे लोणी येथील नळ पाणीपुरवठा योजने साठी ८ kw थ्री फेज क्षमतेची बसवन्यात आलेल्या सोलार सिस्टिम साठी नेट मीटर पुरवठा व त्यास लागणारे इतर साहित्य पुरवणे व कार्यान्वित करणे बाबत...

14 वा वित्त आयोग निधी अंतर्गत मौजे लोणी येथील ग्रामपंचायत कार्यालया साठी ५ kw (१phase) क्षमतेची सोलार सिस्टिम बसविणे व कार्यन्वित करणे आणि मौजे लोणी येथील नळ पाणीपुरवठा योजने साठी ८ kw थ्री फेज क्षमतेची बसवन्यात आलेल्या सोलार सिस्टिम साठी नेट मीटर पुरवठा व त्यास लागणारे इतर साहित्य पुरवणे व कार्यान्वित करणे बाबत...

ई-निविदा दोन लिफाफा पद्दतीने मागविण्यात येत आहे.

| **अ.नं.** | **वस्तूचे नाव** | **नग** | **निविदा रक्कम** | **निविदा विक्री रक्कम** | **बयाना/इसारा रक्कम** |
|---|---|---|---|---|---|
| 1 | मौजे लोणी येथील ग्रामपंचायत कार्यालया साठी ५ kw (१phase) क्षमतेची सोलार सिस्टिम (roof top solar system ongrid ) (सिंगल फेज नेट मीटर सहित) (solar panel make- vikram/waree) (net miter generation | 1 | 4,02,500 /- | 200/- | 4,025/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | miter) आणि त्यास लागणारे इतर साहित्य पुरवणे व कार्यान्वित करणे. | | | | |
| 2 | मौजे लोणी येथील नळ पाणीपुरवठा योजने साठी ८ kw थ्री फेज क्षमतेची बसवन्यात आलेल्या सोलार सिस्टिम साठी नेट मीटर पुरवठा व त्यास लागणारे इतर साहित्य पुरवणे व कार्यान्वित करणे ( net miter/generation miter/invertor) | 1 | 1,80,838/- | 200/- | 1,808/- |

## निविदेच्या अटी व शर्ती

वरील साहित्य खरेदी निविदा प्रक्रिया ई-निविदा प्रक्रियेद्वारे https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर ऑनलाईन करण्यात येईल तसेच या निविदेबाबत सर्व सूचना शुद्धीपत्रके इ. या संकेतस्थळावर ऑनलाईन प्रसिद्ध केली जातील. निविदेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे सदर संपूर्ण निविदा प्रक्रिया ई निविदाद्वारे ऑनलाईन पदधतिने संगणक प्रणालीवर होईल. सदर निविदे संदभातील निविदा नोटीस प्रसिद्धी सूचना शुद्धीपत्रके इत्यादीची माहिती http://mahatenders.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

वरील कामांची निविदा प्रपत्रे http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देणेत आली आहेत. सदर निविदा प्रपत्रे अटी शर्ती इ सदर संकेतस्थळावरन दिनांक ०४/०२/२०२२ रोजी सकाळी १०.०० वाजेपासून ते दि. १०/०२/२०२२ सायंकाळी ६.०० वाजेपर्यत अधिग्रहित (Download) करता येतील.

# ग्रामपंचायत लोणी

## ता.खंडाळा जि.सातारा.

वरील कामांची निविदा http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक ०४/०२/२०२२ रोजी सकाळी १० .०० वाजेपासून ते दिनांक १०/०२/२०२२ सायंकाळी ६.०० वाजेपर्यत इलेक्ट्रोनिक्स फॉर्मटमध्ये ऑनलाईन पदधतिने सादर करता येतील.

सदर कामाचे निविदाबाबत प्रक्रियेचे माहितीसाठी खालील इंग्रजीमधील जाहिरात पहावी. सदर इंग्रजीमधील जाहिरात अंतिम राहील.

निविदा फी व इसारा फी (EMD) RTGS/NEFT व्दारे भरल्याबाबतचे विहित नमुन्यातील प्रमाणपत्र (as per part of e tendering document and process) संबंधित RTGS/NEFT चा युनिक ट्रानझकशन रजिस्ट्रशन क्रमांक (UTR) नोंदवून तांत्रिक लिफाफ्या सोबत अपलोड करणेत यावा.

1. मौजे लोणी येथील ग्रामपंचायत कार्यालया साठी ५ kw (१ phase) क्षमतेची सोलार सिस्टिम आणि मौजे लोणी येथील नळ पाणीपुरवठा योजने साठी ८ kw थ्री फेज क्षमतेची बसवन्यात आलेल्या सोलार सिस्टिम साठी नेट मीटर पुरवठा करणे व कार्यान्वित करण्यासाठी फक्त सातारा व पुणे जिल्हातील अधिकृत उत्पादक किंवा पुरवठाधारक यांचेकडून फक्त ई-निविदा मागविण्यात येत आहेत.
2. पुरवण्यात येणाऱ्या सर्व साहित्यांची रॉयल्टी, विक्रीकर, आयकर व शासनाने इतर उपकर व फी भरावयाची जबाबदारी पुरवठा धारकाची राहील व त्यातील कोणत्याही नियमाचा भंग झाल्यास दंड वा शिक्षेस पुरवठाधारक स्वतः जबाबदार राहील त्यामुळे BOQ मध्ये साहित्याचे दर सर्व करासहित विचार करून नोंदवावे.
3. कामाचा अनुभव किंव्हा शासकीय कार्यालयात यापूर्वी सदरच्या साहित्याचा पुरवठा केला असल्यास त्या पुरवठा आदेशाची प्रत तांत्रिक लिफाफ्यात जोडण्यात यावी.
4. मंजूर निविदेतील साहित्यांचे दर निविदा मंजूर दिनांकापासून 120 दिवसापर्यंत लागू राहतील. बाजारपेठेत सदर साहित्यांचे दर वाढल्यास वाढीव दराची रक्कम ग्रामपंचायत देणार नाही.
5. निविदा मंजूर झाल्यास पुरवठाधारकास आदेशपत्र देण्यापूर्वी रुपये 100/- च्या स्टॅम्प पेपरवर विहित नमुन्यात करारनामा करून देणे बंधनकारक राहील.
6. पुरवठाधारकाने पुरविलेल्या साहित्यांचे देयके निधीचे उपलब्धतेनुसार अदा करण्यात येतील मात्र कोणत्याही प्रकारचे अग्रिम दिले जाणार नाही.

7. एकच अथवा सर्वच निविदा कारणे न देता अंशतः / संपुर्ण नाकारणेचा अधिकार सरपंच / ग्रामसेवक ग्रा. पं. लोणी ता. खंडाळा यांना राखुन ठेवला आहे. त्याप्रमाणे निविदा का नाकारली याचा खुलासा कोणालाही मागता येणार नाही.
8. निविदा मंजुरीनंतर मान्यकेल्याप्रमाणे साहित्य पुरवठा केला नाही तर दिलेले आदेश रद्द करण्यात येतील याबाबत संबंधिताची कोणतीच तक्रार विचारात घेतली जाणार नाही. मान्यकेल्याप्रमाणे साहित्य न पुरविल्यास सदर पुरवठाधारकाची रक्कम देण्यास ग्रामपंचायत जबाबदार राहणार नाही. तसेच गरजेप्रमाणे साहित्य कमी किंवा जादा प्रमाणात खरेदी केले जाईल.
9. निविदेला मंजुरी मिळाल्यानंतर मालाचा पुरवठा करणेपुर्वी कार्यादेश मिळालेल्या पुरवठाधारकाने संबंधित तयार असणारे साहित्य पुरवठा करण्यापूर्वी ग्रामपंचायतीसमोर साहित्याच्या कार्यक्षमता व गुणवत्तेविषयी चर्चा करून ठरल्याप्रमाणे साहित्याचा पुरवठा करणे बंधनकारक राहील. मान्यकेल्याप्रमाणे साहित्य असल्याची खात्री झाल्यावर मालाचा पुरवठा आदेश मिळाल्यावर दिलेल्या कालावधीत कामाचा ठिकाणी स्वखर्चाने पोहोच केले पाहिजे. ग्रामपंचायत कार्यालयाचे प्रतिनिधी साहित्याची तपासणी करतील व त्यावेळी पुरवठादराने निकृष्ट प्रतीच्या साहित्याचा पुरवठा केला असेल तर ते साहित्य ग्रामपंचायत स्वीकारणार नाही व यामध्ये पुरवठाधारकाचे नुकसानीस ग्रामपंचायत जबाबदार राहणार नाही. यानंतर साहित्य खरेदीस नवीन निविदा प्रसिद्ध केली जाईल. मुदतीत साहित्य पुरवठा न केल्यास प्रति दिन रु. 1000/- दंडाची आकारणी केली जाईल. विलंबाने साहित्य पुरवठा केल्यास दंडाची रक्कम बिलातुन वजा केली जाईल.
10. निविदेबाबत काही वाद निर्माण झाल्यास त्याबाबत ग्रामपंचायत लोणी ता. खंडाळा जो निर्णय घेईल तो तक्रारधारकास बंधनकारक राहील.
11. निविदेसोबत जोडलेल्या कागदपत्रांचे सादरीकरण करणे बंधनकारक राहील.
12. मौजे लोणी येथील ग्रामपंचायत कार्यालया साठी ५ kw (१phase) क्षमतेची सोलार सिस्टिम बसविणे आणि कार्यन्वित करणे आणि मौजे लोणी येथील नळ पाणीपुरवठा योजने साठी ८ kw थ्री फेज क्षमतेची बसवऱ्यात आलेल्या सोलार सिस्टिम साठी नेट मीटर पुरवठा करणे व कार्यान्वित करणे बाबतची स्थळ पाहणी करून याबाबत ग्रामपंचायत दाखला आवश्यक असून त्याबाबतचा दाखला तांत्रिक लिफाफ्यात जोडणे बंधनकारक आहे.
13. निविदाधारक हा MNRE/MEDA मानाकांनाप्रमाणे साहित्य पुरवठा करणाऱ्याला प्राधान्य देण्यात येईल.

14. जी ई एम वर नोंदणी असणाऱ्या पुरवठा धारकास प्राधान्य देण्यात येईल.
15. निविदाधारकाने कार्यालयीन सोयीसाठी ई-निविदा भरतेवेळी स्वतः चा अधीकृत पत्ता, दूरध्वनी संपर्क क्रमांक, ई-मेल आयडी. नोंदविणे आवश्यक आहे.
16. निविदाधारकाने निविदा मंजूर झालेनंतर सदरचा पुरवठा केलेल्या जाणाऱ्या सर्वच साहित्याची back to back ग्यारंटी बाबत माहिती देणे आवश्यक असून मुद्रांकावर करारनामा करावा लागेल त्यानंतर कामाचा आदेश देण्यात येईल.

**लिफाफा क्र. 1 मध्ये स्कॅन करून अपलोड करावयाची कागदपत्रे**

- ग्रामसेवक ग्रामपंचायत लोणी ता. खंडाळा यांचे नावे निविदा फॉर्म फी व इसारा (बयाणा) (EMD) फी ONLINE द्वारा जमा करावी. व सदरील सदर निविदा फी आणि इसारा (बयाणा) (EMD) फी भरलेल्या प्रमाणपत्राची ऑनलाइन प्रत लिफाफ्यात (कव्हर नं.1 मध्ये) सोबत ऑनलाईन अपलोड करावी.
- सन २०२०-२१ आयकर प्रमाणपत्र स्कॅन कॉपी.
- पॅन कार्ड स्कॅन कॉपी.
- जीएसटी प्रमाणपत्राची स्कॅन कॉपी.
- शॉप ॲक्ट/ व्यवसाय ना हरकत दाखला / msme रजिस्ट्रेशन प्रमाणपत्राची स्कॅन कॉपी.
- डीस्ट्रीब्यूटर सर्टीफीकेट अथवा सुपर स्टॉकिस्ट सर्टीफीकेट.
- निविदाधारकाच्या लेटरपॅड वरील बंदपत्र.

**लिफाफा क्र. 2 मध्ये स्कॅन करून अपलोड करावयाची कागदपत्रे**

- BOQ.

| ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी | सरपंच |
|---|---|
| ग्रामपंचायत लोणी ता. खंडाळा जि. सातारा | ग्रामपंचायत लोणी ता. खंडाळा जि. सातारा |

# ग्रामपंचायत लोणी

## ता.खंडाळा जि.सातारा.

**(ON 500 RS. STAMP)**

बंधपत्र

कामाचे नाव - मौजे लोणी येथील ग्रामपंचायत कार्यालया साठी ५ kw (१phase) क्षमतेची सोलार सिस्टिम बसविणे व कार्यान्वित करणे आणि मौजे लोणी येथील नळ पाणीपुरवठा योजने साठी ८ kw थ्री फेज क्षमतेची बसवन्यात आलेल्या सोलार सिस्टिम साठी नेट मीटर पुरवठा करणे व कार्यान्वित करणे..

मी /आम्ही गांभीर्यपूरक नमूद करतो की मी /आम्ही वर नमूद केलेल्या कामाच्या ई -निविदेच्या सर्व अटी शर्ती काळजीपूर्वक वाचल्याअसून या निविदेसाठी माझे /आमचे दर निविदे सोबत असलेल्या BOQ फाईल मध्ये नमूद करीत आहोत . जर माझी /आमची निविदा स्वीकृत करण्यात आली तर या निविदेतील सर्व अटी व शर्ती चे पालन करण्यास मी /आम्ही बांधील राहू .या अटी व शर्तीचा मी /आम्ही भंग केल्यास या निविदेतील अटी व शर्तीमध्ये दिलेल्या तपशिला नुसार मी /आम्ही दंडनीय कार्यवाहीस पात्र राहू .याशिवाय माझी /आमची निविदा मंजूर झाल्यास कामासाठी चांगल्यादर्ज्याचे साहित्य वापरून हे काम प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली दर्जात्मक काम करण्याची मी /आम्ही हमी देतो.

तसेच संकेत स्थळावर ई -निविदेच्या ई -लिफाफा क्रमांक 1 व 2 मध्ये जी आवश्यक कागदपत्रे स्कॅनकरून अपलोड करत आहे. ती सत्य आहेत असे सत्य प्रतिज्ञेवर लिहून देत आहे.

वरील सर्व अटी व शर्ती मला /आम्हास मान्य आहेत.

स्थळ :

दि .u निविदा धारकाची

सही व शिक्का

नाव :

पत्ता :

मोबाईल क्र: .